# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय

रामनगर सुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट क्रमांक - ३५६/२०२४ दिनांक २७/०९/२०२४

## प्रेस नोट

**"अल्पवयीन मुलीवरील बलात्काराचे गुन्हयातील आरोपी यास १० वर्षे सश्रम कारावास व ५,०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ०३ महीने साधा कारावासाची शिक्षा.!!"**

अल्पवयीन मुलीवर आरोपीत याने वेळोवेळी बलात्कार करुन ती गरोदर राहील्याने तिचा गर्भपात केलेबाबत पिडीत अल्पवयीन मुलीने दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक ०२.०५.२०१६ रोजी काशिमीरा पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक ३०९/२०१६ भा.द.वि.सं. कलम ३७६ (२) (एन), ३२८ सह पोक्सो कलम ४, ६ व ८ अन्वये गुन्हा दाखल केला होता. गुन्हयाचा तपास प्राथमिक तपास सपोनि गोविंद बोराडे व त्यानंतरचा तपास पोनि धनाजी कळंत्रे यांनी केला असून मा. विशेष सत्र न्यायालय ठाणे येथे दोषारोपपत्र सादर केले होते त्याचा स्पेशल पोक्सो केस क्रमांक ३३०/२०१६ असा आहे.

**सदर गुन्हयामध्ये मा. विशेष सत्र न्यायाधीश साो. ठाणे यांनी केस चालवून आरोपीत यास गुन्हयाकरीता दोषी धरुन १० वर्षे सश्रम कारावास व ५०००/- रुपये दंड, दंड न भरल्यास ०३ महीने साधा कारवास अशी शिक्षा दिनांक २६.०९.२०२४ रोजी सुनावली आहे.**

सदर केसची सुनावणी चालु असताना मा. श्री प्रकाश गायकवाड, पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ मिरारोड विभाग, मा.श्री विजयकुमार मराठे, सहा. पोलीस आयुक्त मिरारोड विभाग, वपोनि/श्री राजेंद्र कांबळे, काशिमीरा पोलीस ठाणे यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले.

तपासिक अधिकारी म्हणून १.सपोनि गोविंद बोराडे, २. पोनि धनाजी कळंत्रे यांनी, कोर्ट डयुटी अंमलदार म्हणुन पोशि/१४०५५ साईदास चव्हाण, व पोशि/१६०१५ अनिल मढवी यांनी आणि समन्स बजावणी डयुटी अंमलदार म्हणून पोहवा/१२०११ सचिन बर्डे यांनी कामकाज पाहीले.

-----ooo-----